(1)

The Archangel Education Foundation's KURJIR PUBLIC SCHOOL

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन( अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१४

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१३/६०४५४/१५-क(५)/१२०१९, दिनांक २४ डिसेंबर, २०१३.

<u>प्रस्तावना -</u>

स्वयंअर्थसहायित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहायित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ०८ ऑगस्ट,२०१३ पर्यंत अर्ज मागविण्यात

आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय-</u>

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ३७०० प्रस्तावांपैकी खालीलप्रमाणे एकूण २२१७ प्रस्तावांना याद्वारे शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | वर्गीकरण | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव | एकूण प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | १८०४ | १३२५ | ३१२९ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ४१३ | १५८ | ५७१ |
| | एकूण | २२१७ | १४८३ | ३७०० |

**१.१ नवीन शाळा परवानगी व शाळांचा दर्जावाढ** - या सोबतच्या **विवरणपत्र- अ** मध्ये दर्शविलेल्या शाळांना, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यांकरीता याद्वारे शासन परवानगी देत आहे.

**१.२.अपात्र शाळा-** नवीन शाळा स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिरित्या कळविण्यात येईल .

**२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -**

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळांच्या व्यवस्थापनांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत प्रथम** मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

The Archangel Education Foundation's KUNJIR PUBLIC SCHOOL

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच <u>**रद्दबातल**</u> ठरेल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या विवरणपत्रातील यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना
i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,
ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे <u>बंधनकारक</u> राहील

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा**- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,

"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेलाक २०१४०२२८११२४०१९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.03.01 11:46:12 +05'30'

(रा.ग.गुंजाळ)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

शासन निर्णय क्र. एसएफएस-१११४/प्र.क्र. ४०/एसएम- २, दिनांक २६ फेब्रुवारी २०१४ चे सहपत्र

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २०६ | पुणे | अजिक्यतारा क्रिडा व शैक्षणिक प्रतिष्ठान, शिक्रापूर, ता.शिरुर,जि.पुणे | अजिक्यतारा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिक्रापूर, ता.शिरुर,जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| २०७ | पुणे | ग्रामविकास शिक्षण संस्था, टाकळी हाजी, ता.शिरुर, जि.पुणे | एस.पी.गावडे इंग्लिश मिडीयम स्कूल, टाकळी हाजी, ता.शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| २०८ | पुणे | न्यू हिंद एज्युकेशन सोसायटी, पौड, ता.मुळशी, जि.पुणे | झील स्कूल, पौड, ता.मुळशी, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| २०९ | पुणे | संजीवनी सोशल फाऊंडेशन, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | डॉ. कदम गुरुकुल, 229/1 पुणे-सोलापूर बायपास, इंदापूर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| २१० | पुणे | श्री. संत तुकाराम शिक्षण संस्था, चंदननगर, पुणे-14 | जोगेश्वरी माता इंग्लिश मिडीयम स्कूल, वाडेबोल्हाई, ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| २११ | पुणे | विकास प्रतिष्ठान, चंद्नननगर, पुणे-14 | पार्वतीज चॅम्पीयन कॉन्व्हेंट प्रायमरी स्कूल, करंदी, ता.शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| २१२ | पुणे | ऑर्बिस एज्युकेशन सोसायटी, एम.जी.रोड,पुणे | दि ऑर्बिस स्कूल, माजरी रोड, केशवनगर, मुंढवा, पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (CBSE) | इंग्रजी | पात्र |
| २१३ | पुणे | सेंट जोसेफ एज्युकेशनल ट्रस्ट, शिरुर, जि.पुणे | सेंट जोसेफ इंग्लिश मिडीयम स्कूल, रामलिंग रोड, शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| २१४ | पुणे | श्री ज्ञानसाई शिक्षण प्रसारक मंडळ, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | स्पार्कल्स इंटरनॅशनल स्कूल, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| २१५ | पुणे | आर्चएंजल एज्युकेशन फाऊंडेशन, मांजरी बु., ता.हवेली, जि.पुणे | कुंजीर पब्लिक स्कूल, स.न.7,मांजरी बु., ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| २१६ | पुणे | ज्ञानज्योत शिक्षण प्रसारक मंडळ, कोये, ता. खेड जि.पुणे | श्री सिध्देश्वर इंग्लिश मिडीयन स्कूल, वेताळे ता. खेड जि.पुणे. | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| २१७ | पुणे | औद्योगिक शिक्षण मंडळ, चिंचवड, पुणे-09 | ए.एस.एम्स.एम्प्रोस इंटरनॅशनल स्कूल, चिंचवड, पुणे-19 | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| २१८ | पुणे | औद्योगिक शिक्षण मंडळ, चिंचवड, पुणे-09 | ए.एस.एम्स्. एम्प्रोस इंटरनॅशनल स्कूल, तळेगाव दाभाडे, ता. मावळ जि.पुणे. | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |

The Archangel Education Foundations KUNJIR PUBLIC SCHOOL

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम- २**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ जून, २०१६

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१५-१६/माध्य-क(३०१)/२९८१, दिनांक ५ मे, २०१६

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ५३०१ प्रस्तावांपैकी

खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम,** शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०६१७१७१८५०९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0499b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2016.06.18 13:45:18 +05'30'

**( रा. ग. गुंजाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचांलक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण) बृहन्मुंबई
१०.सर्व संबधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका
११.निवडनस्ती (एसएम-२).

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १०३४ | पुणे | डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे फर्ग्युसन कॉलेज कॅम्पस पुणे ४११००४. | डी ई एस इंग्लिश मेडीअम स्कूल शिरूर प्लॉट नंबर ३५६ व ३५७ , शिरूर , ता. शिरूर जि. पुणे . | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ६ वी ते १२ वी) | इंग्रजी |
| १०३५ | पुणे | बालाजी शिक्षण प्रसारक मंडळमु. पो. जातेगाव बु. ता.शिरूर जि.पुणे | बालाजी उच्च प्राथमिक विद्यालयरामलिंग रोड शिरूर | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | मराठी |
| १०३६ | पुणे | श्री संत शिरोमणी तुकाराम महाराज प्रतिष्ठानमु पो झारगडवाडी ता बारामती जि पुणे | संत तुकाराम महाराज प्राथमिक विद्यालयमु पो डोर्लेवाडी ता बारामती जि पुणे 413102 | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | मराठी |
| १०३७ | पुणे | चाकण शिक्षण मंडळ चाकणआगरवाडी रोड, चाकण ता.खेड जि.पुणे ४१०५०१ | नावोन्मेश प्राथमिक विद्यामंदिर चाकणआगरवाडी रोड चाकण ता.खेड जि.पुणे ४१०५०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | मराठी |
| १०३८ | पुणे | श्री छत्रपति संभाजी राजे शिक्षण संस्थामु पो चांबळी ता. पुरंदर जि. पुणे ४१२३०१ | हिलटोप उप्पर प्रायमरी स्कूल चांबळी मु. पो चांबळी ता. पुरंदर जि. पुणे ४१२३०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |
| १०३९ | पुणे | श्री गजानन महाराज एजुकेशन सोसायटी गोऱ्हे बुद्रुकगट न. २४२, गोऱ्हे बुद्रुक, तालुका हवेली, जिल्हा पुणे, पिन-४११०२५. | नोब्ले ब्लूमिंग बड्स स्कूलगट न. २४२, गोऱ्हे बुद्रुक, तालुका- हवेली, जिल्हा- पुणे, पिन-४११०२५. | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४० | पुणे | सिद्धी एज्युकेशन सोसायटी आणि रिसर्च फौंडेशन मु.पो.- येणेरे , ता.- जुन्नर जि., पुणे . पिन -४१०५०२ . | इंडियन इंग्लिश मेडियम स्कूलमु.पो.- येणेरे , ता.-जुन्नर जि., पुणे . पिन - ४१०५०२ . | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४१ | पुणे | एस ए.एज्युकेशन ट्रस्टतुन्गागाव , साकी विहार रोड , मुंबई | शिवाजीराव वाळूंज इंग्लिश मेडियम स्कूलमु.पो. आव्हात , ता. खेद ,जि. ,पुणे पिन ४१२४०२ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४२ | पुणे | एकलव्य शिक्षण संस्था राजगुरुनगर डाक बंगलामुक्काम पोस्ट राजगुरुनगर डाक बंगला तालुका खेड जिल्हा पुणे | विद्यासागर इंग्लिश मेडियम स्कूल राजगुरुनगरमु पोस्ट राजगुरुनगर डाक बंगला तालुका खेड जिल्हा पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४३ | पुणे | तुळजाभवानी एजुकेशन सोसायटीमु.पो.शिरसटवाडी ता.इंदापूर जि.पुणे | तुळजाभवानी इंग्लिश मिडीयम स्कूलमु.पो.निमगाव केतकी | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४४ | पुणे | साई विद्या प्रतिष्ठानबालाजीनगर, मेदनकरवाडी, चाकण, ता - खेड जि - पुणे ४१० ५०१ | होली एंजल्स इंग्लिश मेडीअमभोसे, वडगाव घेनंद रोड, चाकण ता - खेड जि - पुणे ४१० ५०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४५ | पुणे | आर्च एंजल एज्युकेशन फौंडेशन स.नं /७ /२ /२ मांजरी बु. ता. हवेली.जि.पुणे कुंजीर वस्ती | कुंजीर पब्लिक स्कूलस.नं /७ /२ /२ मांजरी बु. ता. हवेली.जि.पुणे कुंजीर वस्ती पिन -४१२३०७ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४६ | पुणे | कन्नड संघ पुणेस.न. ३६, सी.डी.स.स. चा जवळ, गणेशनगर, एरंडवणे, पुणे - ४११०३८. | कावेरी पब्लिक स्कुलस.न.: ३५, वडगाव शिंदे रस्था, लोहगाव, पुणे- ४११०४७. | दर्जावाढ | आय.सी.एस.ई | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४७ | पुणे | न्यू एज्युकेशन सोसायटी४४२, सोमवार पेठ , पुणे ४११०११ | एम एच पटेल इंग्लिश मेडिअम प्री प्रायमरी व प्रायमरी स्कूल ४४२, सोमवार पेठ , पुणे ४११०११ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४८ | पुणे | फलक एज्युकेशन सोसायटीस .नं.५ /१ अ , लेन २ ,हाउस ७०४ ,भाग्योदय नगर कोंढवा खुर्द ,पुणे ४११०४८ . | ब्राईट फ्युचर स्कूल स.नं ४६ .कोंढवा खुर्द , पुणे ४१०४८ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी) | इंग्रजी |

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.१०८२/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २० सप्टेंबर, २०१९

<u>प्रस्तावना</u> :- दि अर्चान्जेल एज्युकेशन फौंडेशन, कुंजीर वस्ती, मांजरी बु.,ता.हवेली,जि.पुणे संचलित कुंजीर पब्लिक स्कुल,मांजरी बु.ता.हवेली,जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय-</u>

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत दि अर्चान्जेल एज्युकेशन फौंडेशन, कुंजीर वस्ती, मांजरी बु.,ता.हवेली,जि.पुणे संचलित कुंजीर पब्लिक स्कुल,मांजरी बु.ता.हवेली,जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या उच्च प्राथमिक शाळेस जोडून माध्यमिक ते उच्च माध्यमिक ( इयत्ता ९ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ.) अशी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ <u>अटी व शर्ती-</u>

१) संस्थेने प्रस्तावित शाळा शासन मंजुरीपुर्वीच सुरु केली नसल्याची संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यानी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरु केली असल्यास विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सदर शाळेकडून रुपये एक लक्ष इतका दंड वसूल करुन त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून

Scanned by CamScanner

अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

(७) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(रा.वि.कुडले)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे,
६. शिक्षणाधिकारी,जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक),पुणे .
७. निवड नस्ती /एसएम-२ (१०८२/१९)

Scanned by CamScanner